दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३२७ वा | शुक्रवार दि. २२ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## निवडणुका मुदतीआधी घेतल्या जातील : पृथ्वीराज चव्हाण



**मुंबई ।** अगामी निवडणुकीत पाच राज्ये आपल्या हातातून जातील, या भीतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेच्या निवडणुका मुदतीआधी घेतील, असे भाकीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सातारा जिल्ह्यातील काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेत बोलताना केले. देशात हुकूमशाही आणण्याकडे मोदींची पावले पडू लागली असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच पुढील काही महिन्यात लोकसभेच्या निवडणुका होण्याची शक्यता देखील यांनी व्यक्त केली आहे.

# सुप्रीम कोर्टाच्या दणक्यानंतर राहुल नार्वेकर तातडीने दिल्लीला रवाना

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेल्या शिवसेनेतील १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत लवकरच अंतिम निकाल येण्याची चिन्हे दिसत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने अपात्रतेच्या निर्णयाबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडून होणाऱ्या दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली होती. या सगळ्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश देत सर्वोच्च न्यायालयाने एकप्रकारे विधानसभा अध्यक्षांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय तातडीने घेण्याचे अप्रत्यक्ष निर्देश दिले होते. यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मी कोणत्याही परिस्थितीत घाईत निर्णय घेणार नाही, अशी भूमिका घेतली होती. मात्र, गुरुवारी राहुल नार्वेकर हे अचानक दिल्लीच्या दिशेने रवाना झाले. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, राहुल नार्वेकर यांनी मात्र दिल्लीवारीबाबत या सर्व शक्यता फेटाळल्या आहेत. माझा दिल्ली दौरा हा पूर्वनियोजत होता. त्यासाठीच मी आज दिल्लीला जात आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात घडणाऱ्या इतर गोष्टींकडे तुम्ही लक्ष देऊ नका. तुम्ही फक्त माझ्या निर्णयाकडे लक्ष द्या. हा निर्णय घेताना कोणताही दिरंगाई होणार नाही. त्याचप्रमाणे निर्णय घेताना घाईही केली जाणार नाही, जेणेकरुन त्यामुळे कोणताही चुकीचा निर्णय घेतला जाणार नाही. या प्रकरणात घटनेच्या चौकटीत बसणारा निर्णय घेतला जाईल, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केले. राहुल नार्वेकर यांच्या दिल्ली दौऱ्यावर प्रतिक्रिया देताना संजय शिरसाट म्हणाले, आमचे दिल्लीतील वकील, ज्यांनी सर्वोच्च न्यायालयात आमची बाजू मांडली. त्यांच्याशी चर्चा करणं महत्त्वाचं आहे. शिवाय सर्वोच्च न्यायालयाचा नेमका आदेश काय आहे? हेही समजून घ्यायला पाहिजे. यासाठी राहुल नार्वेकर दिल्लीला गेले आहेत. त्यात विशेष काही नाही. सर्वोच्च न्यायालयाने काही कालमर्यादा दिली नाही. पण न्यायालयाने सांगितलंय की, ही कारवाई थोडी जलद गतीने करा. यासाठी प्रक्रिया डावलून कारवाई करा, असं म्हटलं नाही. त्यामुळे प्रक्रियेप्रमाणे ही कारवाई करायची आहे. यासाठी विधानसभा अध्यक्षांसाठी जेवढा वेळ लागणार आहे, त्यासंदर्भात दिल्लीत चर्चा होईल, असे संजय शिरसाट यांनी सांगितले.



### ठाकरे - शिंदेंना बजावणार नोटीस

**दुसरीकडे, नार्वेकर पुढील १-२ दिवसांत अपात्रतेशी संबंधित सुनावणीसाठी शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नोटीस बजावणार असल्याची माहिती आहे. त्यानुसार ते आठवड्याभरात हा मुद्दा निकाली काढण्याच्या विचारात असल्याचा दावाही केला जात आहे. यामुळे पुढील काही दिवसांत राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे.**

### शिंदे गटाची बाजू भक्कम असल्याचा दावा

**शिवसेनेच्या सत्ताधारी शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी आमदार अपात्रतेच्या मुद्यावर आपल्या पक्षाची बाजू बळकट असल्याचा दावा केला आहे. आम्हाला पुढील एक-दोन दिवसांत नोटीस मिळण्याची शक्यता आहे. आम्ही त्याला उत्तर देऊ. आमची बाजू दुबळी नाही तर भक्कम आहे, असे ते म्हणाले.**

### आदेशाचे पालन होईल

**संजय शिरसाट पुढे म्हणाले की, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर कायदे तज्ज्ञांशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला जात आहेत. ते त्यांच्या निर्देशांनुसार आपली कारवाई करतील. यापूर्वी त्यांनी २ आठवड्यांची मुदत दिली होती. पण सध्या थोडीशी घाई आहे. पण या प्रकरणी कोर्टाच्या आदेशाचे पालन केले जाईल.**

## न्यूज कॉलम

### चिंचवे शिवारात अपघात; एक ठार, एक गंभीर

**नाशिक ।** मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील देवळा तालुक्यातील चिंचवे शिवारात आज अर्टिगा कारच्या झालेल्या अपघातात वऱ्हाळे येथील एकाचा मृत्यू तर सौंदाणे येथील एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. नाशिकहून मालेगावच्या दिशेने येणाऱ्या एम. एच. ४८ एस. ६२३८ या अर्टिगा गाडीवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने गाडी विरुद्ध बाजूच्या दिशेला जाऊन धडकली. भावेश अविनाश गोसावी यांचा मृत्यू झाला तर सौंदाणे येथील भैय्या पवार हे गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे.

### जमिनीच्या वादातून दांपत्यास मारहाण

**धुळे ।** मुकटी बसथांब्यावर जमिनीच्या वादातून दांपत्यास मारहाण झाली. रेखाबाई ज्ञानेश्वर पाटील यांच्या फिर्यादीनुसार त्यांनी आईची जमीन नावावर का करत आहे, असे विचारले. शिवाजी संभाजी पाटील याने पती ज्ञानेश्वर पाटील यांना विटांनी मारून जखमी केले. विवेक शिवाजी पाटील, धनंजय सुरेश पाटील (सर्व रा. मुकटी, ता. धुळे) यांनी रेखाबाईसह ज्ञानेश्वर पाटील यांना शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच ठार करण्याची धमकी दिली.

# कांदा व्यापाऱ्यांनी कांदा खरेदी पूर्ववत सुरू करावी: दादाजी भुसे



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यात कांदा व्यापारी संघटनांनी कालपासून जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या आवरातील कांदा लिलावात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. कांदा व्यापारी व शेतकरी यांच्या प्रश्नांवर सकारात्मक दृष्टीकोनातून तोडगा काढण्यासाठी पणन मंत्री यांनी २६ सप्टेंबर रोजी बैठकीचे आयोजन केले आहे. त्या अनुषंगाने कांदा व्यापाऱ्यांनी कांदा खरेदी पूर्ववत सुरू करण्याचे आवाहन राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले आहे.

काल जिल्हाधिकारी कार्यालयात कांदा व्यापारी, शेतकरी यांच्या प्रश्नांबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक फयाज मुलाणी, जिल्ह्यातील कृषी बाजार समित्यांचे प्रमुख, व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी व शेतकरी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे म्हणाले, कांदा व्यापारी व शेतकरी यांचे जिल्हा पातळीवरील प्रश्न सोडविण्यास प्राधान्य असून कांदा व्यापारांच्या बाबतीत सकारात्मक दृष्टीकोनातून त्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहचविण्यात आल्या आहेत. २६ सप्टेंबर रोजी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी आयोजित केलेल्या बैठकीस जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पणन मंडळाचे सहव्यवस्थापक आदी अधिकारी उपस्थित राहाणार आहेत. या बैठकीत कांदा व्यापारी व शेतकरी यांच्याशी चर्चा करून कांदाप्रश्नाबाबत योग्य निर्णय घेतला जाणार असल्याचे यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे यांनी उपस्थित कांदा व्यापारी, संघटना आणि शेतकरी प्रतिनिधी यांना अश्वासित केले.

पालकमंत्री भुसे पुढे म्हणाले, नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन होते त्याचप्रमाणे नाफेड व सहकारी संस्थामार्फत कांद्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी होत आहे. एनसीसीएफ व नाफेड यांचे कार्य बाजारात स्थिरता ठेवण्याचे आहे. जिल्ह्यातील बाजार समितीतील अनुज्ञप्तीधारक व्यापारी व आडते यांनी कांदा लिलावात सहभागी न होण्याबाबत घेतलेल्या भूमिकेमुळे शेतकरी वर्गास त्यांचा शेतीमाल विक्री करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. या अडचणी दूर होण्यासाठी त्याचसोबत गणोशोत्सव व आगामी येणाऱ्या सणांचा विचार करून व्यापाऱ्यांनी कांदा खरेदी सुरू करण्याचे आवाहन पालकमंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी केले. यास प्रतिसाद म्हणून उपस्थित व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींनी त्वरीत जिल्ह्यातील बाजार समितीमधील व्यापाऱ्यांची बैठक घेवून योग्य तो निर्णय घेणार असल्याचे बैठकीत सांगितले. यावेळी नाफेड कडून खरेदी झालेला कांदा व निर्यात झालेला कांदा यांचा अहवाल सादर करण्याचे निर्देशही पालकमंत्री दादाजी भुसे यांनी बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

# गणेश विसर्जन मार्गावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात

**धुळे । प्रतिनिधी**



लाडक्या गणरायाचे मंगळवारी मंगलमय वातावरणात आगमन झाले. मनपा प्रशासनाकडून आता विसर्जन मिरवणुकीची तयारी केली जात आहे. मनपाने मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजवण्यास सुरुवात केली आहे. तसेच मुख्य मार्गावरील पथदिवे दुरुस्तीसाठी नवीन पथदिवे बसविण्यात येत आहे. त्यामुळे विसर्जन मिरवणुका निर्विघ्नपणे पार पडतील.

महापालिका प्रशासनाने शहरातील मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजवण्यास सुरुवात केली आहे. त्यात गल्ली नंबर १ ते ७, ऐंशी फुटी रोड, नकाणे रोड, बारा पत्थर रोड, नगरपट्टी रोड, जुने महापालिका चौक भागातील रस्त्यावर मुरुम, बारीक खडी व त्यावर डांबरीकरण करुन खड्डे बुजवले जात आहे. आग्रारोड, पारोळा रोड रस्त्यावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बुजवले जात आहे. त्यानुसार मालेगांव रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगावबारी पर्यंत आग्रा रोडवरील मुख्य खड्डे बुजवण्यात येत आहे. आग्रा रोडवर दत्त मंदिर एसएसव्हीपीएस महाविद्यालयापर्यंत रस्त्यावरील खड्डे डांबरीकरणाचे पॅच मारुन दुरुस्त केले जात आहे. तसेच मनपाच्या विद्युत विभागातर्फे पथदिवे बसविण्यात येणार आहे. यासाठी नवीन २५० एलईडी पथदिवे प्राप्त झाले आहे. तर विसर्जन स्थळावर पाचव्या दिवशी लाईट लावण्यात येणार आहे. शहरात सार्वजनिक गणेश मंडळाची काही वर्षापासून गणपती स्थापनाची परंपरा आहे. शहरात सर्वत्र चौकाचौकात सार्वजनिक गणेश मंडळातर्फे गणपती मुर्तीची स्थापना केली जाते. त्याकरीता चौकात गणपती बसवताना नियमांचे पालन करुन ते बसविण्यात येतात. यासाठी महापालिकेकडून आतापर्यंत ६५ गणेश मंडळानी परवानगी घेत स्थापना केली आहे.

# आमोदे येथे स्पिरिटचा अवैध साठा जप्त


**धुळे । प्रतिनिधी**

आमोदे (ता. शिरपूर) शिवारात पत्र्याच्या शेडमध्ये स्पिरिटचा साठा अवैधरित्या केल्याचे आढळले. एका संशयीतास ताब्यात घेतले असून पन्नास हजारांचा स्पिरीट साठा जप्त करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक मनोज शेवरे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली आज सकाली छापा टाकला.

आमोदे शिवारात संगीता लॉजच्या बाजूला पत्र्याच्या शेडमध्ये अज्ञाताने अवैध रित्या स्पिरिटचा साठा विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवला होता. २५० लिटर व ३५ लिटर ड्रम मधील पातळ द्रवाचा वास घेतला असता ते स्पिरीट होते. महेंद्र बाबूसिंग गिरासे (वय ४५ वर्ष रा. आमोदे ता. शिरपूर) यास ताब्यात घेतले. सर्व मुद्देमाल त्याचाच असून तो खुल्या बाजारात अवैधरित्या विक्री करत असल्याचे मान्य केले. त्याचे ताब्यातून एकूण ५३ हजार ६०० रुपयांचा स्पिरीटसाठा दारूबंदी गुन्ह्याखाली जप्त करून त्यास अटक करण्यात आली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक डी. पी. नेहूल, ए. पी. मते, दुय्यम निरीक्षक ए. सी. मानकर निरीक्षक, ए. बी. निकुंबे, जवान केतन जाधव, शांतीलाल देवरे,.मनोज धुळेकर, वाहन चालक रवींद्र देसले यांचे पथकाने कारवाई केली. श्री. मानकर तपास करीत आहेत.

## शिवगर्जना ग्रुपची देखणी मूर्ती



**धुळे । शहरातील शिवगर्जना ग्रुप मित्र मंडळातर्फे सालाबादप्रमाणे यंदाही गणरायाची देखणी मूर्ती लक्ष वेधून घेते आहे. गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी अध्यक्ष भरत गोरे, उपाध्यक्ष प्रफुल्ल जगताप, सचिव पप्पू बाविस्कर, सेक्रेटरी प्रितेश अग्रवाल, दैनिक लक्ष महाराष्ट्राचे संपादक चंद्रशेखर पाटील, अनिल महाजन, राजेंद्र चिंचोले, राजेंद्र संन्यासी, संजय जडे, संजय शर्मा, संजय गुळवे, सोमनाथ बहालकर, प्रवीण घुगे, आशिष शर्मा, दीपक अहिरे, पप्पू वारकर, गणेश लंगोटे, सागर कासार, युवराज खरात, मिथुन कासार, अजिंक्य महाजन, प्रतीक रंधे, प्रसन्न काळे, रुपेश जडे, प्रेम संन्यासी परिसरातील नागरिक परिश्रम घेत आहेत**

# मिल परिसराला अक्कलपाडा योजनेचे पाणी द्या!

**शीतल नवले, सारिका अग्रवाल, सुरेखा उगलेंची मागणी**

**धुळे । प्रतिनिधी**

मिल परिसरासह अवधान, पिराची टेकडी व हिरे मेडीकल कॉलेजला पाणी पुरवठा करणार्या डेडरगाव तलावातील जलसाठा घटला आहे. त्यामुळे वरील भागात अक्कलपाडा योजनेचे पाणी देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी माजी सभापती तथा नगरसेवक शीतलकुमार नवले, महिला व बालकल्याण सभापती सारिका अग्रवाल व नगरसेविका सुरेखा उगले यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी मनपा आयुक्तांना पत्र दिले आहे. पत्रात म्हटले आहे की, धुळे शहर हद्दीत पाणी पुरवठा करणारा डेडरगाव तलाव असून डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी या तलावाचे बांधकाम केलेले आहे. सदर तलाव १०० ते १२५ वर्षानंतर यंदा प्रथमच १०० टक्के भरलेला नाही. या वर्षी धुळे शहर परिसरात पाऊस कमी झाल्याने डेडरगाव तलावात साधारणतः १० ते १५ दिवस पाणी पुरेल एवढाच जलसाठा शिल्लक आहे. सदर तलावातून धुळे शहरातील मिल परिसर मोहाडी, अवधान, पिराची टेकडी, हिरे मेडिकल कॉलेज पाणीपुरवठा केला जात आहे. परंतु, तलावातील जलसाठा आटत चाललण्याने वरील भागाला पाणी पुरवठा करण्यास अडचण येणार आहे. तरी सध्यस्थितीत अक्कलपाडा धरण पूर्णतः भरलेले असल्याने वरील भागात अक्कलपाडा योजनेचे पाणी देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. अन्यथा या भागातील रहिवाशींना पाण्यापासून वंचित राहावे लागेल, अशी मागणी पत्रातून करण्यात आली आहे.

# गणेशोत्सव : देखाव्यांमध्ये चांद्रयान-३ ची धूम

यंदाच्या गणेशोत्सवात घरगुती देखाव्यांमध्ये चांद्रयान-३ ची धूम सर्वत्र दिसत आहे. खास करुन विद्यार्थ्यांनी मोठ्या कौशल्याने चांद्रयान-३ चे देखावे साकारले आहेत. शहरांसह ग्रामीण भागातही अशा देखाव्यांची सर्वांना भुरळ पडली आहे.


गणेश मूर्तीच्या जवळच चांद्रयान-३ चे देखावे आकर्षकपणे मांडले आहेत. चांद्रयान-३ यशस्वी झाल्यानंतर इस्त्रोच्या शास्त्रज्ञांचे जगभरातून कौतुक झाले. चांद्रयान-३ ची क्रेझ यावर्षीच्या गणेशोत्सवात स्पष्टपणे दिसत आहे. घरगुती गणेशोत्सवात चांद्रयान-३ चे आकर्षक देखावे करताना कापूस, कार्डशीट कागद, आकर्षक लायटींग व्यवस्था, विविध रंग अशा साहित्याचा वापर केला आहे. हे देखावे करताना गुगलवरील माहितीचा आधार घेतला आहे. चांद्रयान-३ चे देखावे हुबेहुब साकार करण्यासाठी परिश्रम घेण्यात आले आहेत. शिरोळ तालुक्यातील जवळपास सर्वच गावांमध्ये चांद्रयान-३ चे देखावे साकारले आहेत. खास करुन रात्रीच्या अंधारात हे देखावे खुलून दिसत आहेत. चांद्रयान-३ च्या देखाव्यातून विद्यार्थ्यांच्या प्रयोगशीलतेला चालना मिळत आहे.

शहरातील घरगुती गणेशोत्सव आणि देखावे यांचे अतुट नाते आहे. त्यामुळे शहरातील अनेक घरांत आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांत घरगुती देखावा पाहायला मिळतो. शहरासह ग्रामीण भागातही बहुतांशी घरात गणेशोत्सवाच्या कालावधीत चलतचित्राचे देखावे करण्याची परंपरा आहे. यंदा अनेकांनी आपल्या घरातील गणपती बाप्पांसमोर असे देखावे साकारले आहेत. हे आकर्षक देखावे पाहण्यासाठी लोकांची प्रचंड गर्दी होत आहे. सामाजिक, धार्मिक, प्रबोधनात्मक अशा विविध विषयांवरील देखावे सादर करण्यावर मंडळांनी भर दिला आहे. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्नही या माध्यमातूनमांडले जातात. घरगुती देखावे तयार करण्यासाठी अनेक दिवसांपासून तयारी केली जाते. काहींनी तयार देखावे आणले असले तरी काहींनी कलाकुसरीने तयार केलेले देखावे व चलतचित्र तितकेच आकर्षक ठरत आहेत.

### चांद्रयान ३, देखाव्यांचे विशेष आकर्षण


**घरगुती गणेशोत्सवातही छोटे-मोठे देखावे, चलचित्र व समाजाला संदेश देणाऱ्या सजावट करण्यावर भर दिला जातो. यंदा तर जिल्ह्यात अनेकांच्या घरी चांद्रयान ३, देखाव्यांचे विशेष आकर्षण दिसून येत आहे.**





### मोहिमेचे कौतुक

**गणेशोत्सव काळात वेगवेगळ्या प्रकारचे विधायक उपक्रम राबवले जातात. त्यातच चांद्रयान ३ ची क्रेझ अजून कमी झालेली नाही. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर आपले यान यशस्वीरित्या उतरवणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. जगभरात या चांद्रयान ३ या मोहिमेचे कौतुक झाले आणि आजही त्याबाबत चर्चा रंगताना पाहायला मिळतात.**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

# पाच वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील देवभाने गावात एका पाच वर्षाच्या बालिकेवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. एका भांड्याच्या कंपनीत हा अत्याचाराचा प्रकार घडला. नराधमाने मुलीला आपल्या घरात बोलवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

पीडित बालिकेच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.२० सप्टेंबर रोजी सायंकाळी सात ते साडेसात वाजेच्या सुमारास त्यांच्या पाच वर्षीय बालिकेस शेजारी रहाणारा दिनेश गणावर साहनी उर्फ बडका बाबू (३३), रा.हंतराल, तहसील होराई, जि.मुज्जफरपूर, बिहार, ह.मु. देवभाने, ता.जि.धुळे हा त्याच्या घरात घेवून गेला. तिथे त्याने मुलीवर लैंगिक अत्याचार केला. सदर मुलगी घराबाहेर दिसत नसल्याने पीडितेच्या आईने आवाज दिला. आवाज दिल्यानंतर पीडितेने शेजारच्या शेडमधून होकार भरला; तेव्हा अत्याचाराच्या घटनेलाही वाचा फुटली. नराधम आणि पीडितेचे आई- वडील एकाच कंपनीत मजदुरी करतात. ते एकमेकांना ओळखत असल्याने पीडितेने त्याच्यावर विश्वास ठेवला. अन् त्याने त्याच विश्वासाचा गैरफायदा घेवून डाव साधला. पीडितेच्या आईने सोनगीर पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून दिनेश साहनी याचेवर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## अजूनही मुलगी नकोशी का?

मुलगीच जन्माला आली म्हणून वडिलांचा किती संताप व्हावा? मुलगी झाली म्हणून पती रोज अमानुष मारहाण करत असल्याची तक्रार झारखंडमधील एका महिलेने पोलिसांकडे केली. तिची कहाणी ऐकून महिला पोलिसांच्या डोळ्यात पाणी आल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. मुलगी आईवडिलांना किती नकोशी व्हावी? भीक मागण्यासाठी चार वर्षांच्या चिमुरडीची केवळ दोन हजार रुपयांत विक्री केल्याची करुण घटना पुणे परिसरात नुकतीच उघडकीस आली. या घटनेत जात पंचायतीचा देखील सहभाग पोलिसांना आढळला आहे.

तो अनेक प्रश्न निर्माण करणारा ठरू शकेल. मुलगी सांभाळावी अशी परिस्थिती नव्हती असे तिच्या आईवडिलांनी पोलिसांना सांगितले. ते न पटणारे आणि कोणत्याही दृष्टिकोनातून समर्थनीय नाहीच. अजाण बालिकेची विक्री करणे हा एकच उपाय त्यांच्याकडे असावा का? मुलगा असता तर त्यांनी विकला असता का? बहुसंख्य आईवडिलांना मुलगी नकोशी असते हे आता वेगळे सांगायला नको. त्याची कारणेही समाज जाणून आहे. पण त्यात बदल करायची इच्छा मात्र कोणाचीच नसावी याकडे वरील घटना अंगुलीनिर्देश करतात. जातपंचायतीचा हैदोस नवा नाही. दुर्दैवाने कायदाही त्याला आळा घालू शकला नाही आणि पंचांनाही कायद्याची भीती वाटत नाही. जात पंचांच्या साक्षीने आणि त्यांच्या परवानगीने मुलीची विक्री झाल्याचे निष्पन्न झाले. त्यासाठी पंचानी पैसे घेतले. हे जास्त भयानक आहे. कशाच्या आधारे त्यांनी परवानगी दिली? म्हणजे जातपंचांना देण्यासाठी मुलीच्या आईवडिलांकडे पैसे आहेत पण मुलीला सांभाळण्यासाठी नाहीत हे कोणालाही पटणारे नाही. त्यांना सहा मुली आहेत असे त्यांनी पोलिसांना सांगितले.

परिस्थिती नाही तरी सहा मुलींचा जन्म त्यांनी होऊ का दिला? म्हणजेच पोटी मुलगा जन्माला यावा अशीच त्यांची इच्छा असणार का? त्यासाठी त्यांनी सहा मुली होऊ दिल्या असतील का? छोटे कुटुंब, सुखी कुटूंब अशी जाहिरात सरकार करते. त्याचा पुरस्कार व्हावा म्हणून वेळोवेळी योजना देखील जाहीर केल्या जातात. त्या लोकांपर्यंत पोहोचत नसाव्यात का? सामाजिक संस्थाही हे पटवून देऊ शकत नसाव्यात का? मुलगाच हवा या लालसेने एका अजाण बालिका विकली गेली. नकळत्या वयात तिच्या वाट्याला जाच आला. यात दोष कोणा एकाचा नाही. चिमूरडीचे पालक, तिला विकत घेणारे, जात पंचायतींचे पंच आणि ही अमानुष घटना उघड्या डोळ्याने बघणारे हे सगळे सारखेच दोषी आहेत. कारवाई सर्वांवर व्हायला हवी. सरकार देखील तितकेच दोषी मानले जाऊ शकेल का? जात पंचायतविरोधी कायदा संमत झाला आहे. असा कायदा करणारे देशातील पहिले राज्य म्हणून नेते नेहमीच त्यांची पाठ थोपटून घेतात. तथापि त्या कायद्याची प्रभावी अमलबजावणी होत नाही अशी तक्रार सामाजिक कार्यकर्ते करतात. कायद्याची कडक अमलबजावणी झाली तर बेकायदा कृत्य करण्याची जात पंचायतींची हिंमत होऊ शकेल का? सरकार ते कर्तव्य कठोरपणे पार पाडेल अपेक्षा जनतेने करा

# महिला आरक्षणाचे श्रेय मोदींनाच

केंद्रातील मोदी सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत लोकसभा आणि विधानसभा दोन्हींमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाचे विधेयक आणले. विशेष म्हणजे या निर्णयाचे विरोधकांनीही स्वागत केले आहे. नवीन संसदभवनात कामकाजाच्या पहिल्या दिवशी केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी मंगळवारी 'नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयक' सादर केले आणि चर्चे नंतर ते आज लोकसभेत मंजूरही झाले. महिलांना लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये एक तृतियांश आरक्षणाची तरतूद करण्यासाठी राज्यघटनेत १२८वी दुरुस्ती करणाऱ्या विधेयकावर सध्या लोकसभेत चर्चा सुरू आहे. या विधेयकामुळे महिला लोकप्रतिनिधींचा राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर धोरणांच्या निर्मितीत सहभाग वाढणार आहे. त्याचप्रमाणे नारीशक्ती वंदन विधेयक मंजूर झाल्यावर लोकसभेत महिलांच्या जागा ८२ वरून १८०हून अधिक होणार आहेत. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर, जनगणनेवर आधारित मतदारसंघ फेररचना पूर्ण झाल्यानंतर महिलांसाठी जागा राखीव ठेवल्या जाणार आहेत.



कायदा लागू झाल्यानंतर महिला आरक्षण १५ वर्षे अनिवार्य ठेवण्याची तरतूद या विधेयकात आहे. सध्याच्या लोकसभेत ८२ महिला लोकप्रतिनिधी आहेत. एकंदर ५४३ सदस्यांच्या तुलनेत ही संख्या १४ टक्के इतकी आहे. अनुसूचित जाती आणि जमातींसाठीच्या आरक्षणाअंतर्गत येणाऱ्या जागांमध्येही अनुसूचित जाती आणि जमातींच्या महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद या नारीशक्ती वंदन विधेयकात आहे. महिला आरक्षण विधेयकामध्ये लोकसभा आणि राज्यांच्या विधानमंडळांमध्ये महिलांना एक तृतियांश आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. विधेयकानुसार, महिलांसाठी जागा आवर्तनाच्या आधारावर राखीव ठेवल्या जातील आणि ड्रॉ पद्धतीद्वारे ठरवल्या जातील. तीन सलग सार्वत्रिक निवडणुकांमध्ये एकदा एक जागा महिलांसाठी राखीव ठेवली जाईल.

भारताचे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या कार्यकाळात सप्टेंबर १९९६ मध्ये महिला विधेयक लोकसभेत मांडण्यात आले होते. मात्र लोकसभेत हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही आणि त्यानंतर हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले होते. या समितीने डिसेंबर १९९६ मध्ये त्यांचा अहवाल दाखल केलेला होता. या विधेयकावर चर्चा होण्यापूर्वीच लोकसभा विसर्जित झाली आणि हे विधेयक रद्द झाले होते. त्यानंतर बाराव्या लोकसभेत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने हे विधेयक पुन्हा एकदा लोकसभेत मांडले. तत्कालीन कायदामंत्री एम. थंबिदुराई यांनी हे विधेयक संसदेत सादर केले आणि राजद (राष्ट्रीय जनता दल)चे एक खासदार लोकसभेच्या हौद्यात आले आणि त्यांनी या विधेयकाची प्रतच फाडून टाकली. त्याही वर्षी या विधेयकाला खासदारांचे समर्थन मिळवता आले नव्हते. त्यानंतर १९९९, २००२ आणि २००३ मध्ये हे विधेयक सभागृहात मांडण्यात आले. मात्र एकदाही हे विधेयक मंजूर होऊ शकले नव्हते. काँग्रेस, भाजप आणि डाव्या पक्षाच्या अनेक सदस्यांचा पाठिंबा असूनही या विधेयकाला मंजुरी मिळू शकली नाही हे विशेष. २००८ मध्ये, मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने हे विधेयक राज्यसभेत मांडले आणि ते ९ मार्च २०१० रोजी १८६ विरुद्ध १ मतांनी हे विधेयक मंजूरही झाले होते. मात्र लोकसभेत मांडण्याकरिता हे विधेयक कधीही यादीत घेतले गेले नाही आणि पंधराव्या लोकसभेच्या विसर्जनाबरोबरच हे विधेयकही विसर्जित झाले. त्याचे कारण असे की, लालू प्रसाद यादव यांचा राजद, जदयू (जनता दल युनायटेड) आणि समाजवादी पक्षाचा या विधेयकाला प्रामुख्याने विरोध होता. त्यावेळी जदयूचे नेते शरद यादव यांनी त्यावेळी विचारलेला एक प्रश्न प्रचंड गाजला होता. ते म्हणाले होते की, ''या कमी केस ठेवणाऱ्या महिला, आमच्या (ग्रामीण भागातील महिला) महिलांचं प्रतिनिधित्व कशा करू शकतील?'' त्यामुळे काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारला महिला आरक्षण विधेयक दोन्ही सभागृहांत मंजूर करून घेण्याचे धाडस झाले नाही.


स्वातंत्र्यपूर्व काळातही महिलांना राजकीय आरक्षण देण्याची मागणी केली गेली होती. बेगम शाह नवाज आणि सरोजिनी नायडू यांनी १९३१ मध्ये तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात नवीन राज्यघटनेतील स्त्रियांच्या परिस्थितीबाबत उल्लेख केलेला होता. तसेच संविधान सभेच्या चर्चेतही महिला आरक्षणाचा मुद्दा आला होता, पण तो अनावश्यक असल्याचे सांगून या मुद्द्यावर चर्चा टाळली गेली. भारतातील बहुतांश राजकीय पक्षांचे नेतृत्व पुरुषांच्या हातात असल्याने देशातील महिलांची परिस्थिती सुधारण्यासाठी हे विधेयक मंजूर होणे गरजेचे असल्याचे अनेक जाणकारांची मते आहेत. महिला आरक्षणासाठी पाठिंबा देताना, ओबीसी, एससी महिलांना त्यात आरक्षणाची तरतूद असावी, अशी मागणी लोकसभेत अनेक खासदारांकडून करण्यात आली. तसेच हे विधेयक तत्काळ लागू करावे, असे सांगत काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी विधेयकाला पाठिंबा दिला असला तरी गेल्या २७ वर्षांत कोणत्याही सरकारला महिला आरक्षण विधेयक पुढे आणण्याचे जे धैर्य दाखवणे जमले नव्हते, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात होणार आहे; परंतु देशाची जनजणना होऊन महिलांसाठी कोणत्या जागा सोडायच्या या प्रक्रियेला वेळ असला तरी महिला आरक्षण विधेयक दोन्ही सभागृहांत मंजूर करून त्याचे आगामी काळात कायद्यात रूपांतर करण्याचे काम मोदी सरकारच्या कार्यकाळात झाले, याचे श्रेय मोदींनाच जाईल आणि त्याची इतिहासात नोंद होईल.

# सुशिक्षित बेरोजगारांना संधी कधी मिळणार?

**शासकीय सेवेतून निवृत्त होऊन सुद्धा पुन्हा त्यांनाच विविध ठिकाणी कामाच्या संधी दिल्या जात असतील, तर सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी कधी मिळणार हा खरा प्रश्न आहे. तेव्हा या प्रश्नाचे उत्तर शोधत बसण्यापेक्षा जे तरूण सुशिक्षित बेरोजगार आहेत. त्यांना पूर्ण वेतनी पगाराची नोकरी दिली गेली पाहिजे. कारण आपला देश हा तरुणांचा देश आहे, असे देशाचे प्रधानमंत्री सांगतात. त्यामुळे आपल्या देशात वाढणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांचा विचार करता देशातील राज्यकर्त्यांनी सुशिक्षित बेकारांचा नोकरीचा विषय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सुशिक्षित बेकार कोणाला म्हणतात, हे समजून घेऊ.**

'आपल्या देशातील ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले असेल, त्याची काम करण्याची इच्छा, शक्ती व पात्रता असून त्याला काम मिळत नसेल, तर अशा व्यक्तीला सुशिक्षित बेकार असे म्हणतात. यामध्ये दहावी, बारावी, विविध कोर्स, अध्यापक पदवी, पदवीधर व पदव्युत्तर असे शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला जर काम मिळत नसेल, तर त्या व्यक्तीला सुशिक्षित बेकार असे म्हणतो. आज आपल्या देशात सुशिक्षित बेकारांची संख्या वाढताना दिसत आहे.

देशात तसेच राज्यात ज्याप्रमाणे शिक्षण घेतले जाते. त्याप्रमाणात काम मिळाले पाहिजे. ही शासनाची जबाबदारी आहे. समजा असेच चालले, तर पुढच्या पिढीचे काय? जर पदव्या घेऊन सुद्धा योग्य पगाराची नोकरी मिळत नसेल, तर त्या पदव्या घ्याव्यात का? असा प्रश्न तरुणांपुढे निर्माण होत आहे. तेव्हा असा प्रश्न आजच्या तरुणांपुढे निर्माण होऊ नये म्हणून योग्य उपाय सुचवून त्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे देशाच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. आजचे तरुण हे उद्या देशाचे सुजाण नागरिक आहेत. सुजाण नागरिक होण्यासाठी उच्च शिक्षण आणि त्याला अनुसरून असणारी नोकरी मिळायला हवी. यातून देशाचा आर्थिक विकास होत असतो. सध्या





तर राज्याच्या आर्थिक परिस्थितीचे कारण पुढे करीत हंगामी नोकर भरती खासगी नऊ कंपन्यांच्या माध्यमातून केली जात आहे. यामध्ये इनोवेव आयटी, सैनिक इंटलिजन्स, सिंग इंटलिजन्स, एस-२ इन्फोटेक, उर्मिला इंटरनॅशनल, क्सेंट टेक, सी.एस.सी.ई. गव्हर्नन्स, क्रिस्टल इंडग्रेटेड आणि सी.एम.एस.आयटी यांचा समावेश आहे. आता सांगा यातल्या महाराष्ट्रातील किती कंपन्या आहेत याचा शोध आपण लावा.

कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता जिल्ह्यात १२१ प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकच नाही. यात देवगड तालुक्यात अधिक शाळा आहेत. अशी परिस्थिती जिल्ह्यात असताना त्याच जिल्ह्यातील डी.एड. व बी.एड. पदवीधारक नोकरीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याची वेळ येते. मात्र त्याच जिल्ह्यातील निवृत्त शिक्षकांना ज्याशाळेत शिक्षक नाहीत अशा शाळेवर हजर रहाण्यासाठी शिक्षण विभाग आदेश देतात. याला काय म्हणावे? आता तर काही ठिकाणी एक व्यक्ती एका ठिकाणी पूर्णवेळ अधिकारी पदावर काम करीत असताना सुद्धा त्यांना अन्य खात्याची जबाबदारी दिली जाते. मागे तर माझा एक मित्र सांगत होता की, एका व्यक्ती जवळ आठ खात्यांचा कारभार आहे. आता सांगा देशात सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत असताना असा अतिरिक्त भार एकाच व्यक्तीकडे देणे योग्य वाटते का? मग सांगा सुशिक्षित बेरोजगारांना संधी कशी मिळणार. त्यांच्या कारभारामध्ये पारदर्शकता अशी येणार. यातून आर्थिक विकास होणार का? मग हंगामी भरती का? यामुळे आर्थिक विषमता वाढण्याला मदत होणार. यातून गरीब अधिक गरीब होत जाणार, तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाणार ही वस्तुस्थिती आहे.

**(क्रमशः)**

## शब्दकोडे-१८५



**आडवे शब्द**

१. कृष्णाचा मित्र ६. जवळपास, सभोवती ९. ढीग ११. प्रत्येक वर्षी १३. रस्ता १४. देशातील किंवा राज्यातील प्रमुख शहर १६. दृष्टिभेट १९. पूर्ण भरतीची वेळ २०. नवा २२. पृथ्वी २३. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसणे २६. प्रत्येक दिवशी, मजुरी २७. जास्त २९. लता, वेल ३०. टिंगल ३१. बोटाच्या टोकावर असते ते ३२. खरेदी ३४. जुने, ऐतिहासिक लेखन ३६. वटवट ३८. जबरदस्तीने (हिंदी) ४०. चेहऱ्याची निमुळती बाजू ४२. ज्वारीची रोटी ४४. माल ४५. हिंदीत कालवा ४६. भाकरी-पोळीचा पाव भाग ४८. अपऱ्या नाकाची ५०. बांबू ५२. आंब्याची पोळी ५४. मांडणी ५६. हिशोबात केलेला गोंधळ ५७. चक्र ५८. रामाचा एक भाऊ ५९. वजनदार ६०. व्यापारी ६१. राजकारणातील पवार, जोशी या मान्यवरांचे नाव ६२. अनुकंपा, करूणा ६३. स्तुतीस्तोत्र ६५. भांडण ६७. मागचे अंगण ६९. प्रत्यक्षात ७१. आशीर्वाद, वर ७३. परंपरागत गण वा संपत्ती ७४. शेत ७५. कावळा ७६. जनन ७७. बळी जाणारा ७८. काळ्या पाठीचे हरीण ७९. उत्तराधिकारी ८०. ताक फुंकून पिणारा ८१. मल्याळी भाषिक राज्य

**उभे शब्द**

१. श्रीकृष्णाचे आयुध २. दरवाजा ३. मत्स्य ४. आटोपते घेणे, आवरणे ५. जोरजबरदस्ती ६. कुंभाराची भट्टी, स्त्री ७. काचेचे पात्र ८. मध्यम प्रमाण ९. कृष्णसखी १०. सुनील गावस्करलिखित एक पुस्तक १२. नम्र १५. शिल्लक १७. असे असल्यास १८. धूळ २१. फायदा २४. नाजूकपणा नसलेले, भडक २५. प्रौढ, जून २६. थेट, स्पष्ट २८. ताणले जाणारे ३३. निमंत्रक, कुटुंबप्रमुख ३५. खणणे ३७. माळी, बागवान ४०. अडथळा, प्रश्न ४१. दरारा ४२. नशीब ४३. घोड्यावरून फेरी ४७. काटेरी औषधी वनस्पती ४९. अगदी थोडे ५१. नम्रपणे झुकलेला ५२. उंट हाकणारा ५३. अकस्मात ५५. त्रैलोक्यात फिरणारा मुनी ५६. महासर्प ५९. संधी ६१. नगर ६२. डुक्कर, ऱ्हस्व उच्चाराने खेकडा ६४. सततची हालचाल ६६. पटकन ६८. रामदासांचा ग्रंथ ६९. बैलांचा सण, बेंदूर ७०. दरवाज्यावरचा आवाज ७२. दृष्टी ७४. माठ, गाडगे ७५. कारस्थान ७८. मृत्यू

### शब्दकोडे १८४चे उत्तर


**आडवे उत्तर**

१.पारध ३.कर्जबाजारी ६.कयास ८.रट्टा ९.डहाळी ११.तपास १३.मसावि १५.खीज १७.भाळ १८.सरा १९.संताप २१.रटरट २२.रवानगी २४.वड २५.मनगट २६.ख २७.रजतमहोत्सव २९.तम ३०.दहन ३२.रकाना ३३.दार ३४.मकरध्वज ३६.सतार ३८.रणरागिणी ४०.निव्वळ ४१.आड ४२.छायाचित्र ४४.पाचर ४६.राजाराणी ४८.पत ४९.कवठ ५१.तलखी ५३.नामकरण ५५.आळ ५६.टर ५८.शरद ६०.वानवा ६३.मदारी ६५.गरीब ६६.पावन ६९.कणीदार ७१.मोहन ७२.साय ७३.टोफू ७४.रावी ७५.बल ७६.कलदार ७७.जमिनजुमला

**उभे उत्तर**

१.पारखी २.धड ३.कळी ४.बावळट ५.रीतसर ६.कस ७.समता ८.रवि १०.हावरट १२.पारावार १४.साप १६.जननमरण १७.भारवाहक १९.संगीतकार २०.मांडव २३.नजर २४.वत्सलता २५.मतदार २५अ.गन्ना २८.मना ३०.दमनी ३१.नरकयातना ३५.जनित्र ३६.सडपातळ ३७.रखरखीत ३९.गिरणी ४२.छाप ४३.आठ ४५.चल ४६.रागीट ४७.राखी ४९.कर ५०.वणवा ५२.ऊर ५४.मकबरा ५५.आवा ५७.रमणीय ५८.शरीर ५९.दसरा ६१.नवनवीन ६२.भाव ६४.दादा ६६.मोमो ६७.पाय ६८.नवल ६९.कसाई ७१.हरामी ७३.टोक ७५.बला

## सोभाव (सुत्र १०)
## बुध्दी आनी मन



डॉ.रा.प्र.पारनेरकर

मानूसन मन आनी त्यानी प्रकृती हाई जशी त्याना सोभावमातला प्रत्यक्ष घटक शेतस तशी त्यानी बुध्दी नै. बुध्दीना तल्लख पना हाऊ गुन मानूसना सोभाववर परिनाम करत नै.जितल बुध्दीन कार्य जो ईचार,त्याना संस्कार या सोभाववर व्हत -हातस.सुविचार नै ते कुविचार ह्या दोन्ही बी बुध्दीनच कामे शेतस.पन ह्या दोन्ही सोभाववर होनारा परिनाम त्यासना विरुद्ध असा शे.एखादा मानूस सूवइचआरई का बनस? आनी एखादा वाईट ईचारना कुविचारी कसा व्हस हाऊ प्रश्न अभ्यासन्या दृष्टीखाल मोठाच गंभीर शे.फक्त तोंडवर उत्तर टाकान व्हईन ते असं म्हननं पूर्वकर्म म्हनीसन मोकय व्हता इन.बुध्दी हाई मनपेक्षा पुढली गोट शे हाई खरं पन ती मननी एक शाखा व्हवामुये मनवर बुध्दीना जसा संस्कार व्हतस तशाच बुध्दीनं. वयन हाई मन लावत -हास.मन हाई जितल दुर्बल वा अशक्त -हास तितलच ते जास्त ईकारी -हास. मननी सहजावस्था जितली जास्त पोसायनी तितलीच मननी स्थिती प्रतिकारक्षम, खंबीर -हास.आस मन बाह्य आमीषकडे आकर्षित व्हत नै.आनी म्हनीसन ते बुद्धी दे सुविचार वयन लावस. थोडकामा सांगावं झाये ते पयले मन,आपली बुद्धीले मगदुरपरमाने वयन लावस.त्यानंतर बुध्दी आपला विचार कार्यापरमाने मनले वयन लावत-हास.अर्थातमानूसना सोभाव निर्मितीन्या दृष्टीने मन श्रेष्ठ नै ते बुद्धी श्रेष्ठ हाई म्हनामा काही देखील अर्थ उरत नै.कारन सोभाव परिनत होनारं मन बुद्धीना मुये संस्कारीत -हास.तस त्याच बुद्धीले दिशा लावानंकार्य पहिले मन करत -हास.मूल सबद वयखाले लागस म्हन्जे बुद्धी जनमले येऊ लागस . त्यानंतर ते वस्तून निरीक्षण करू लागस. त्यामुये ती बुद्धी साकारस.सरयसाधा वाक्यानं उमजेल बुद्धी चांगली पोसायल व्हईन.हाऊ क्रम व्यवस्थीत लावा ते तैल बुद्धी निरमान व्हस.पन निरीक्षन कमी पडन आनी पयले वाक्यार्थ समजू लागना ते मानूस मंद बुद्धीना आनी विचाय तोंडाय निरमान व्हस.आसासनी स्मरनशक्ती चांगलीच तयार व्हत -हास.स्मरन शक्तीमुये पाठांतर करेल झाये ते ह्याले एक परकारनी बुद्धी त्याले नशा चढस.आनी तो जास्तीना बडबड्या बनस. शब्दवएधआनं स्मरनशक्ती आनी वस्तून निरीक्षन विचारशक्ती निरमान व्हस.मूलसबद वयखू लागस.तधय पालकसनी त्याले निरीक्षन,देखानी दृष्टी कशी वाढीन यांना ईचार करता येवासाठे येई ते काम करो.कुविचार नै ते सुविचार नै ते मंदबुद्धी नै ते तैल बुद्धी हाई त्यानं पूर्व कर्म नं फय नै शे.

**– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# वाहतुकीच्या कोंडीवर मात करण्यासाठी मुलूंड ते वडपे दरम्यान एलिव्हेटेड कॉरिडॉरची निर्मिती करावी

## खा. गोडसे यांची केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे आग्रही मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना लवकर मुंबईत पोहोचता यावे, तसेच दिवसभरातील कामे आटोपून झाल्यावर प्रवाशांना लवकरात-लवकर विना ट्रफिक मुंबईतुन बाहेर पडता यावे यासाठी ठोस उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी मुलूंड ते वडपे यादरम्यान सध्या आठ मार्गीकांचे काम सुरू आहे. यादरम्यानच्या पंचवीस किलोमीटर अंतरावर एलिव्हेटेड कॉरिडॉरची निर्मिती करण्यात यावी अशी आग्रही मागणी काल खा. हेमंत गोडसे यांनी रस्ते व वाहतुक महामार्ग विभागाचे मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

मुलूंड ते वडपे यादरम्यान एलिव्हेटेड कॉरिडॉरची निर्मिती करण्याची आपली मागणी योग्य असून उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना दिलासा देण्यासाठी लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याची ग्वाही ना. गडकरी यांनी खा. हेमंत



गोडसे यांना दिली आहे.

एनएच ३ या नॅशनल महामार्गावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले असल्याने नाशिक ते मुंबई यादरम्यानच्या प्रवासास सहा ते साडे सहा तास लागतात. महामार्गावर आधीच खड्डे त्यात वडपे शिवारात आयआरपी कडुन अनेक ठिकाणी कामे सुरू असल्याने महामार्गावर वाहतुकीची मोठी कोंडी होत असते. भविष्यात समृद्धी महामार्गावरून येणारी वाहने वडपे शिवारातुन मुलूंडकडे जाणार असल्याने मुलूंड ते वडपे यादरम्यान वाहतुकीची भयंकर समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे मुलूंड ते वडपे दरम्यान एलिव्हेटेड कॉरिडॉरची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील विविध संस्था, संघटना आणि पक्षांच्या पदाधिकाऱ्यांकडून खा. गोडसे यांच्याकडे होत आहे.

प्रवाशांची मागणी न्यायिक असल्याने काल खा. गोडसे यांनी दिल्लीत रस्ते व वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव, नगर या जिल्ह्यामंधील हजारो वाहने रोज मुंबई मंत्रालयात येतात. दिवरभराची कामे आटोपल्यानंतर सदर वाहने रात्री पुन्हा गावाकडे परतीच्या प्रवासासाठी निघतात. परंतु मुलूंड ते वडपे यादरम्यान तासंतास वाहतुकीची कोंडी होत असल्याने चालक आणि प्रवाशांची मोठी कुचंबना होत असते. यामुळे प्रवासाचा वेग मंदावत असल्याने प्रवासास मोठा विलंब होतो. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांमध्ये नाराजीचा सुर असून त्यांच्या मनात असंतोषाचे वातावरण आहे. उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशंना दिलासा देण्यासाठी मुलूंड ते वडपे या सुमारे पंचवीस किलोमीटरच्या अंतरावर एलिव्हेटेड कॉरिडॉरची निर्मिती करण्यात यावी अशी आग्रही मागणी खा. हेमंत गोडसे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. यावेळी माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण, संजय सोनवणे, बजुनाना शिरसाठ, रामदास खुळे, संजय गोडसे, सुनिल सोनवणे, काशीनाथ सानप, संतोष गोडसे, आकाश गोडसे, करमचंद्र धुरिया, आकाश साळवे व आदि मान्यवर उपस्थित होते.

### न्यूज कॉलम

**गणेशोत्सवात पोलिसांचे विशेष पथक**

**नाशिक ।** गणेशोत्सवात देखावे बघण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेता आता पोलिस यंत्रणेने भाविकांच्या सुरक्षेसाठी चार ड्रोनद्वारे नजर ठेवण्याचे नियोजन केले आहे. गणेशोत्सवात प्रथमच पोलिसांकडून ड्रोनचा वापर होत असून यासह अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात असणार आहे. अपर पोलिस महासंचालक डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाची आढावा बैठक घेत ड्रोन वापर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. गणेशोत्सव आणि ई द-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांसह टवाळखोरांवर प्रतिबंधक कारवाई होत आहे. शहरात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात असून कुठेही अनुचित प्रकार घडत असल्यास पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलिस बंदोबस्तासह ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार असून ड्रोनच्या चित्रीकरणाच्या आधारे संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे.

## पावणेदोन लाख रुपयांचा एकाला गंडा

**सिडको । प्रतिनिधी**

वस्तू खरेदी-विक्री करून त्या बदल्यात जादा कमिशन मिळवून देण्याचे आमिष दाखवून अज्ञात मोबाईलधारकाने एका तरुणास पावणेदोन लाख रुपयांचा गंडा घातल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी सागर प्रसाद सुरेंद्र रॉय (वय ३६, रा. अमीकुंज रो-हाऊस, महाजननगर, अंबड लिंक रोड, नाशिक) हे कामाच्या शोधात होते. ते ऑनलाईन विविध कामांची माहिती घेत होते. त्यादरम्यान ९८८६९४१५२६ या क्रमांकाच्या अज्ञात मोबाईलधारकाने रॉय यांच्याशी टेलिग्राम व व्हॉट्सअॅपद्वारे संपर्क साधला. अज्ञात आरोपीने रॉय यांना वस्तू खरेदी- विक्री केल्यास त्या बदल्यात जादा कमिशन मिळेल, असे आमिष दाखविले. त्यानुसार फिर्यादी रॉय यांना १ लाख ६९ हजार १०० रुपये किमतीच्या वस्तू आरोपी याने ऑनलाईन विकत घेण्यास भाग पाडले. त्यानंतर आरोपीने फिर्यादी रॉय यांना या वस्तू विकण्यास सांगितले. या वस्तू त्यांनी विकल्यानंतर रॉय यांना एकूण दोन लाख ७५ हजार ६०० रुपयांची रक्कम कमिशन स्वरूपात



मिळणार होती. मात्र आरोपी याने फिर्यादीकडून टेलिग्राम, व्हॉट्सअॅप, तसेच एएमए२२२. वर्क या साईटवरून वेळोवेळी वेगवेगळ्या खात्यांवर १ लाख ६९ हजार १०० रुपये भरण्यास सांगितले होते. त्यानंतर फिर्यादी यांनी ही रक्कम भरली. मात्र रॉय यांनी वस्तू विकल्यानंतर कमिशनचे पैसे आरोपीकडे मागितले होते. परंतु कमिशनची रक्कम फ्रीज करून ते पैसे हवे असल्यास तुम्हाला अधिक वस्तू घ्याव्या लागतील, असे सांगून अज्ञात मोबाईलधारकाने रॉय यांची आर्थिक फसवणूक केली. हा प्रकार दि. ७ व ८ जूनदरम्यान घडला. या प्रकरणी अंबड पोलिस ठाण्यात मोबाईलधारकाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेख करीत आहेत.

## झाडांभोवतीचा काँक्रिटचा फास सोडविण्यासाठी पर्यावरणप्रेमींचे मनपाला साकडे

**नाशिक । प्रतिनिधी**

संपूर्ण देशात शासन प्रशासनाचे माती गोळा करून मेरी माटी मेरा देश अभियान सुरु असतांना नाशिक मधील पर्यावरण प्रेमी संस्थानी वृक्षांसाठी अत्यावश्यक माती वाचविण्याचे अनोखे अभियान महापालिकेच्या माध्यमातून हाती घेतलेले आहे. जिल्हा न्यायालय नाशिक व राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार झाडांभोवती १ मीटर साधारण ३ फुटांपर्यंत काँक्रिटीकरण न करण्याचे आदेश प्रशासनास दिलेले आहे. असे असतांना शहरात अनेक वृक्षांभोवती सर्रास काँक्रिटीकरण झालेले आहे. झाडांभोवतीचा काँक्रिटचा फास सोडविण्यासाठी पर्यावरणप्रेमींनी काल महापालिका अधिकाऱ्यांची भेट घेतली. महापालिका राबवित असलेल्या मेरी माटी मेरा देश अभियाना अंतर्गत सुरवात म्हणून पालिकेच्या ताब्यातील



**माती वाचविण्यासाठी शासन व प्रशासन हे मोठ मोठे उपक्रम राबवित आहे. विकासाच्या नावाखाली स्थानिक प्रशासनाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर सिमेंट काँक्रिटचे रस्ते, मोकळ्या जागेत काँक्रीटीकरण केले जात आहे. तसेच झाडांच्या बुंध्याना काँक्रीटीकरण करून झाडांची व मातीची (जमिनीची) हानी केली जात आहे हे दुर्दैव आहे असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. - निशिकांत पगारे, नाशिक.**

उद्यान, मोकळे भूखंडातील वृक्षांभोवतीचे काँक्रिट त्वरित काढण्याबाबतचे निवेदन मनपा उपायुक्त (प्रशासन) लक्ष्मीकांत सातारकर यांना निशिकांत पगारे, मनीष बाविस्कर, योगेश बर्वे, सुनिल परदेशी, यशवंत लाकडे व नीहाल पाटील यांनी दिले.

वृक्षांभोवतीचे काँक्रिटीकरण काढून मेरी माटी मेरा देश अभियानात सहभागी होण्याची पालिकेला नामी संधी असून पर्यावरण झाडांभोवतीचे काँक्रिटीकरण लक्षात आणून देण्यासाठी नागरिकांनी पालिकेच्या छचउ शलेपपशलीं र्रि वर किंवा पर्यावरण मित्रांच्या ९८३४०२८५९९, ९८२२४१०५५२ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन नागरिकांना केलेले आहे.

## रविवारी सांगितिक गुरूंचे विद्यार्थ्यांकडून अभिष्टचिंतन

**नाशिक । प्रतिनिधी**

संगीत, गायन, वादन, नृत्य या ललित कलाक्षेत्रात गुरु - शिष्य परंपरेला सर्वोच्च स्थान आहे. नंदकुमार देशपांडे संचलित सरगम अकादमीचे ५१ विद्यार्थी सुरांजली अर्पण करणार आहेत. रविवारी (दि. २४) रोजी सकाळी ११ वाजता या सुरेल अभिष्टचिंतन कार्यक्रमाला सुरुवात होईल. निमित्त आहे लोकप्रिय गायक व मार्गदर्शक नंदकुमार देशपांडे दि.२२ सप्टेंबर रोजी ५१ वर्षात पदार्पण करीत आहेत. प्रत्येकी १७ विद्यार्थी - विद्यार्थिनींचे तीन चमू गाणी सादर करतील.

पंचवटी कारंजाजवळ लक्ष्मीबाळ सदन येथे सकाळी ११ पासून माजी - आजी विद्यार्थी ही मैफल सजवणार आहेत. मराठवाड्यातून चरितार्थासाठी नाशिकला आलेल्या नंदकुमार देशपांडे यांनी गेल्या २५ वर्षात सरगम अकादमीच्या माध्यमातून शेकडो विद्यार्थ्यांमधील सुरेल गायक घडवले आहेत. त्यातील अनेकजण त्यांच्या सुरेल गायनाने लोकप्रिय ठरले आहेत. त्यापैकी अनेक गायक सहभागी होतील व कृतज्ञता व्यक्त करतील.


**ॲड. अनिल किसनराव गवळी**
**निशाणी नं. ०६**

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो.यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १११५/२०२३**

मंगलाबाई अरुण शिंदे ......अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ..... जाबदेणार
आणि
कै.अरूण रंगराव शिंदे ........मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. सो. धुळे यांचे कडे दि.१५/०९/२०२३ रोजी कि. दि. अर्ज. नं.१११५/२०२३ चा अर्ज मयत कै. अरूण रंगराव शिंदे यांचे कायदेशीर वारस आहेत. असा वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि३०/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ८ सो. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २१/०९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधीश सो.व स्तर, धुळे
अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश सो.व स्तर, धुळे



**ॲड. डी. व्ही. गायकवाड**
**निशाणी नं. ०९**

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं.७५८/२०२३**

१) श्रीमती सुमित्रा मोना राऊत
उ.व. ६५ वर्षे, धंदा - घरकाम
२) श्री. आशिष मोना राऊत
उ.व. ४४ वर्षे, धंदा -
३) अमोल मोना राऊत
उ.व. ४० वर्षे, धंदा -
४) अजित मोना राऊत
उ. व. ३८ वर्षे, धंदा -

अर्जदार नं. १ ते ४ सर्व रा. देवपुर चर्च कंपाऊन्ड, १० नेहरू नगर,वाडीभोकर रोड, देवपुर धुळे, ता. जि. धुळे ....अर्जदार
वि.
कोणी नाही .....सामनेवाला
कै. मोना भिडा राऊत
मृत्यू दि. २८/०२/२०२३ ..... मयत

ज्याअर्थी वरील अर्जदार हे मयत कै. मोना भिड़ा राऊत यांचे वारस आहेत. मयत कै. मोना भिडा राऊत यांचे दि. २८/०२/२०२३ रोजी निधन झाले, मयत कै. मोना भिडा राऊत यांचे वारसांनी कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. ३ रे सह दिवाणी न्यायालय, क. स्तर यांचे कोर्टात दि.२६/०६/२०२३ रोजी दि.कि. अर्ज नं.७५८/२०२३ दाखल केलेला आहे.

तरी सदर बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक तक्रार, हरकत असल्यास त्यांनी धुळे येथील मा.३ रे सह. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर, यांचे न्यायालयात दि.२५/१०/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून वारस दाखला अर्जदाराच्या लाभात देण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि.१८/०९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय क. स्तर, धुळे
अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर, धुळे



प्रोसेज जमा

**ॲड. एम. सी. बेडसे**
**निशाणी नं. ०६**

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं.३०८/२०२३**

१) गं.भा. चाफाबाई माणिक सोनवणे( भिल), वगैरे .... अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही .........जाबदेणार

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. १६/९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ५ तसेच ६ यांचे वडील व अर्जदार नं. ५-अ) यांचे सासरे तसेच अर्जदार नं. ५-ब) यांचे आजोबा नामे कै. माणिक दावल सोनवणे (भिल) ह्यांचे दि. १२/०८/२०१४ रोजी मौजे काळगाव ता. साक्री जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) गं.भा. चाफाबाई माणिक सोनवणे (भिल) - पत्नी २) श्री. शिवाजी माणिक सोनवणे ( भिल)- मुलगा ३) श्री. ताराचंद माणिक सोनवणे ( भिल)- मुलगा ४) श्री. गुलाब माणिक सोनवणे ( भिल)- मुलगा ५- अ) गं.भा. धुपाबाई भास्कर सोनवणे (भिल)- सुन ५- ब) रतन भास्कर सोनवणे (भिल)- नातू ६) श्री. रोहिदास माणिक सोनवणे (भिल) - मुलगा

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि.२७/१०/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय, साक्री
अधिक्षक, दिवाणी न्यायालय, साक्री



**ॲड. दिनेश वसंतराव गायकवाड**
**निशाणी नं. १५**

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४४३/२०२२**

१) श्री.मारोती नारायण चांगरे
उ.व. ६३ वर्ष, धंदा -मजूरी
२) सौ. मीना मारोती चांगरे
उ.व. ५८ वर्षे, धंदा -गृहीणी
३) चि. हिमांशु भागवत चांगरे
उ.व. ११ वर्षे, धंदा - शिक्षण
४) कु. सुहानी भागवत चांगरे
उ.व. ०९ वर्षे, धंदा -शिक्षण
५) कु. नंदनी भागवत चांगरे
उ.व. ०६ वर्षे, धंदा -शिक्षण

सर्व रा. कृष्ण मंदिर जवळ, प्लॉट नं. २१, कृष्ण नगर, चितोड धुळे ......अर्जदार
वि.
कै. भागवत नारायण चांगरे ......मयत
कुणीही नाही .....सामनेवाला
अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII, १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठीचा

ज्याअर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. धुळे दि. १२/१२/२०२२ रोजी दि. कि. अर्ज. नं. १४४३/२०२२ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII, १८२७ चे कलम प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठीचा अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम स्वरुपी राहत असून अर्जदार अर्जदार नं. १ यांचे भाऊ व अर्जदार नं. ३ ते ५ यांचे वडील कै. भागवत नारायण चांगरे यांचा मृत्यू दि. १३/०८/२०२१ रोजी चितोड, धुळे येथे झाला आहे. त्यांचा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. १९/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्थर सो. कोर्ट नं. यांचे न्यायालयात निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चितकेलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १८/०९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय व. स्तर, धुळे
अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, धुळे

## न्यूज कॉलम

### सोंडले येथे मेंढ्या चारण्यावरून मारहाण

**धुळे ।** मेंढ्या चारण्याच्या कारणावरून सोंडले येथे दादा महादू ठेलारी (रा. सोंडले) व चंद्राबाई पावबा ठेलारी, केसरबाई बापू ठेलारी यांना चौघांनी हाताबुक्क्यांनी व विळ्याने मारहाण करीत जखमी केले. शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. १८ सप्टेंबरला सकाळी अकराच्या सुमारास ही घटना घडली. याबाबत दादा ठेलारी याच्या तक्रीवरून बंटी महादू पाटील, बबलू महादू पाटील, दादू निंबा पाटील (रा. सोनगीर ता. धुळे) व बबलू ऊर्फ योगेश चिंतामण पाटील (रा. सोंडले) यांच्याविरूद्ध शिंदखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### मनपा परिसरातून दुचाकी लंपास

**धुळे ।** शहरातील मोगलाई भागात संजय सुकलाल मोरे (रा. फुलेनगर) या मजुराची दुचाकी (एमएच १८, एएच १२९७) जुन्या महापालिका परिसरातून चोरट्यांनी लंपास केली. तिची किंमत १५ हजार आकारण्यात आली. चोरीची ही घटना १२ सप्टेंबरला सायंकाळी पावणेपाच ते पाचदरम्यान घडली. याबाबत शहर पोलिस ठाण्यात नोंद झाली.

# नुकसानग्रस्त पिकांची आ.पावरा व माजी नगराध्यक्ष पटेलांनी अधिकाऱ्यांसह केली पाहणी



**शिरपूर । प्रतिनिधी**

शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांनी अधिकाऱ्यांसह भारेटेक, पिंप्री व अनेक गावांची नुकसानग्रस्त शेती पिकांची पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना शासन स्तरावरुन तातडीने नुकसान भरपाई देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आश्वासन देवून तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना दिलासा व धीर दिला आहे.

भोरटेक गाव व परिसरातील नुकसानग्रस्त शेती पिकांची पाहणी करुन आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांनी प्रांताधिकारी प्रमोद भामरे, तहसीलदार महेंद्र माळी तसेच भोरटेक गावासह परिसरातील अनेक पदाधिकारी, शेतकरी, ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत बैठक घेवून चर्चा केली. कोणीही नुकसानग्रस्त शेतकरी बांधव शासकिय लाभापासून वंचित राहणार नाही याबाबत सर्वांनी गांभिर्याने अंमलबजावणी करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सरपंच सुरेश पाटील, उपसरपंच मच्छिंद्र जाधव, अशोक जाधव, जयवंत जाधव, मनोज पाटील, प्रदीप जाधव, सुभाष जाधव, भूषण जाधव, भुलेश्वर गोड, रघुनाथ चौधरी, ज्ञानेश्वर चौधरी, पदाधिकारी, शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते. त्यानंतर पिंप्री गाव शिवारातील शेतामध्ये अनेक अंतर पायी फिरत शेतीपिकांची पाहणी करण्यात आली. यावेळी आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्यासह पिळोदा उपसरपंच योगेश बोरसे, पिंप्री सरपंच महेंद्रसिंग राजपूत, माजी सरपंच प्रविणसिंग राजपूत, आर. डी. पाटील, जयपालसिंह गिरासे, भटूसिंग पवार, किशोर पाटील, कोमलसिंग राजपूत, निंबा पाटील, भुरा गिरासे, नामदेव खैरनार, आनंद कोळी, भिला कोळी, मनोज राजपूत, धर्मेश राजपूत, आनंद भिल, गोटूसिंग राजपूत, रविंद्र पवार, रितेश राजपूत, पदाधिकारी, शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तहसीलदार महेंद्र माळी यांनी दिलेल्या शासकिय अहवालानुसार, शिरपूर तालुक्यातील जातोडा, बोरगाव, वनावल, रुदावली, बाळदे, साकवद, गिधाडे, उप्परपिंड, सावळदे, कुरखळी, पिंप्री, आढे, जैतपूर, बाभुळदे, खर्दे खु., पाथर्डे, भोरटेक, अंतुर्ली, लोंढरे, ममाणे, तऱ्हाडी, त.त., खामखेडा प्र.था, अंतुर्ली, जापोरा, पिळोदा, घोडसगाव, टेंभे बु. या २७ गावांमध्ये ७७० शेतकरी बांधवांचे ६६९ हेक्टर क्षेत्र शेती पिकांचे नुकसान झाले आहे. यात केळी, कापूस, मका, तूर, बाजरी, टमाटे आदी पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या २७ गावांमध्ये, शेती शिवारात १६ सप्टेंबर २०२३ रोजी मध्यरात्रीपासून अतिवृष्टी व हातनूर धरणाचे पाणी सोडल्याने तापी नदीतील पाण्यात प्रचंड मोठी वाढ झाली होती. तसेच बॅक वॉटर चे पाणी वाढल्याने तापी काठावरील शेत शिवारात सुमारे पाच ते दहा फूट पाणी २४ तास पेक्षा जास्त काळ साचून राहिले. तापी काठावरील अनेक गावांमधील शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.



# हस्ती स्कूल टेनिक्काईट पटूंच्या संघांची शालेय विभागीय स्पर्धेसाठी निवड

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज दोंडाईचा येथील १४ वर्ष व १७ वर्ष आतील मुली आणि १७ वर्ष व १९ वर्ष आतील मुले यांचे संघ नुकतेच संपन्न झालेल्या शालेय जिल्हास्तरीय टेनिक्काईट स्पर्धेत सहभागी झाले होते. सदरची स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धुळे यांचे तर्फे एस. आर. बी. इंटरनॅशनल स्कूल शिरपूर येथे संपन्न झाली.

सदर स्पर्धेत हस्ती स्कूल मुली व मुले यांच्या टेनिक्काईट संघांनी दैदिप्यमान कामगिरी बजावली. यास्तव त्यांच्या संघांची आगामी विभागीय पातळीवर संपन्न होणाऱ्या शालेय टेनिक्काईट स्पर्धे साठी अभिनंदनीय निवड करण्यात आली. यात पुढील टेनिक्काईट पटूंच्या संघांचा समावेश आहे. १४ वर्ष आतील मुली टेनिक्काईट संघ - अनुष्का देसाई, सायली गावीत, जयश्री भोये, राधिका वळवी, रितीका राउत, प्राची खंडेराय; १७ वर्ष आतील मुली टेनिक्काईट संघ - चांदणी बहिरम, तन्वी वळवी, पूजा वळवी, प्रिती माळवी, माधुरी ठाकरे, सलोनी वळवी; १७ वर्ष आतील मुले टेनिक्काईट संघ - गुरूप्रसाद देवरे, लोकेश चव्हाण, वैभव सोनवणे, हर्षल लाहोटी, प्रणव खैरनार, लोकेश ईशी; १९ वर्ष आतील मुले टेनिक्काईट संघ - केशव महाजन, तिलक चित्ते, प्रज्ञेश शिंदे, मोहम्मद बोहरी, मेहुल जैन, रणवीर गिराई. वरील टेनिक्काईट पटूंच्या संघांना हस्ती स्कूल क्रीडा विभाग प्रमुख प्रकाश खंडेराय, जितेंद्र सुरवाडे यांचे मार्गदर्शन लाभले. तर शालेय समिती चेअरमन कैलास जैन तसेच प्राचार्य हरिकृष्ण निगम यांनी कौतुक केले. हस्ती स्कूल दरवर्षी नियमितपणे अशा स्वरूपाच्या विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होणेस प्रेरित करते. याद्वारा विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त क्रीडा कौशल्यांचा विकास साधला जातो.

# प्रा.डॉ.लहू पवार यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**साक्री । प्रतिनिधी**



येथील सी. गो. पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील प्रा.डॉ.लहू बाबुलाल पवार यांना शिक्षक दिना निमित्त धुळे जिल्हा निसर्ग मित्र समितिचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२३ धुळे येथे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ. लहू पवार यांनी ३१ वर्ष विज्ञान विषय शिकवतांना,सर्वप्रथम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयीची भीती दूर केली.सोप्या पद्धतीने प्राणिशास्त्र विषय शिकवत त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

साक्रीच्या सी. गो. पाटील वरिष्ठ महाविद्यालयात अनेक वर्षांपासून प्राणिशास्त्रासह, पर्यावरणशास्त्र विषय शिकवत असतांना तो विषय विद्यार्थ्यांनी वैयक्तिक जीवनात आचरणात आणून प्रत्येकाने पर्यावरण संवर्धनात आपले योगदान दिले पाहिजे याबाबत जागृती केली. पर्यावरण विषयक ३१ स्वलिखितसंशोधन पेपर व अनेक लेख प्रसिद्ध केले. ७ वेळा पोस्टर व निबंध स्पर्धा आयोजित केल्या. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी ३२ क्रमिक पुस्तके आणि एक आंतरराष्ट्रीय स्तरावरचे संदर्भ पुस्तक स्वतः लिहून प्रकाशित केले. शंभरावर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय कार्यशाळांमध्ये सहभाग नोंदवला. अनेक कार्यशाळेचे संयोजक म्हणून उत्कृष्ट काम पहिले.अशा विविध उपक्रमांमुळे प्रा. डॉ. लहू पवार यांना आतापर्यंत विविध शासकीय, निमशासकीय संस्थानकडून आतापर्यंत ७ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

### निकुंभे शाळेत गणेशमूर्ती कार्यशाळा

**धुळे ।** निकुंभे (ता. धुळे) येथील जिल्हा परीषद शाळेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा झाला. कार्यशाळेत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी चिमुकल्या हातांनी आकर्षक मूर्ती साकारल्या. पहिल्याच प्रयत्नात साकारलेल्या मूर्ती बघून शिक्षकांसह पालकही आनंदी झाले. विद्यार्थी याच पर्यावरणपूरकमूर्ती गणेश चतुर्थीला प्रतिष्ठापित करणार आहेत. शिक्षक प्रशांत खरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा झाली. मुख्याध्यापक अशोक पाटील, शिक्षक गोकुळ पाटील, किशोर माळी, रणजित ठाकूर, धनराज ठाकरे, विजया पाटील, सोनाली बोरसे, हर्षदा बोरसे आदी उपस्थित होते. खरे यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या वापराने पर्यावरणाचे नुकसान कसे होते, ते कसे टाळावे हेही त्यांनी समजावून सांगितले.

# सिडको विभागात राष्ट्रवादीचे दोन आकडी नगरसेवक निवडून आणणार : डहाळे

**सिडको । प्रतिनिधी**



सिडको या बहुसंख्य कामगार वस्तीत आजतागायत न झालेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन आकडी नगरसेवक निवडून आणणार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार यांचे विचार पुढे नेणार असा आत्मविश्वास राष्ट्रवादी युवक काँग्रेस सिडकोचे नवनियुक्त विभागीय अध्यक्ष विक्रांत डहाळे यांनी व्यक्त केला.

नवीन नाशिक मथुरा गार्डन येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा मेळावा व पदग्रहण सोहळा शहर अध्यक्ष गजानन नाना शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महबूब भाई शेख यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडला.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष पुरुषोत्तम कडलग हे होते. मेळाव्यामध्ये नवीन नाशिक राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्षपदी विक्रांत डहाळे यांना सर्वानुमते मेहबूब भाई शेख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले आणि त्यांच्या शेकडो सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या कार्यक्रमाचे आयोजन विभाग अध्यक्ष विजय मटाले, नवीन नाशिक कार्याध्यक्ष कृष्णा मामा काळे यांच्या समवेत सर्व सहकाऱ्यांनी मिळून केले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष कोंडाजी मामा आव्हाड, शादाब सय्यद, शहर सरचिटणीस मुन्नाभाई अन्सारी, गोकुळ शेठ पिंगळे, युवक शहराध्यक्ष बाळा निगळ, शहर कार्याध्यक्ष किरण पानकर, महिला शहराध्यक्ष अनिता दामले, पश्चिम विधानसभा अध्यक्ष धनंजय राहणे, सातपूर विभाग अध्यक्ष प्रवीण नागरे, युवक अध्यक्ष अभिमन्यू गुडघे पाटील, जयेश अहिरे, दर्शन जुन्नरे, आश्विन रोकडे, सुनील घुगे, किरण शिंदे, विशाल बबलू पगार, आनंद पाल, करण आरोटे, प्रांजल सोनार, विकास अहिरे, शाहू वाघ, सोनू कमोद, सागर ठाकरे, यश बागुल, शौर्य बिरारी, अमोल कदम, निलेश शहाणे, सुशांत डहाळे, बबलू कदम, प्रणव नेरकर आदी उपस्थित होते

# मेरी माटी मेरा देश अभियान अंतर्गत विभागामार्फत वृक्षारोपण

**शिरपूर । प्रतिनिधी**

श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालयात मेरी माटी मेरा देश अभियान अंतर्गत एन.एस.एस. विभागामार्फत वृक्षारोपण करण्यात आले.

प्राचार्य डॉ.शारदा शितोळे, उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमासाठी एन.एस.एस.विभाग प्रमुख प्रा.डॉ.रवी मोरे, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा.बी.आय. परदेशी, डॉ.आर.एम.वाडीले, डॉ.एल. झेड.पाटील, एन.एस.एस. च्या विद्यार्थिनी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# पटेल इंग्लिश मीडियम प्रि प्रायमरी स्कूल मध्ये मान्सून रागा कार्यक्रम संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम प्रि प्रायमरी स्कूल मध्ये मान्सून रागा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी पावसाळा ऋतू विषयी माहिती देण्यात आली. पावसाळा ऋतू निरनिराळे रंग घेऊन येतो तसेच निसर्ग सौंदर्य देखील वाढवतो. त्याच निसर्गाची थोडक्यात ओळख करून देण्यात आली. मुलांना जल-चक्र ची माहिती करून देण्यात आली. त्या नंतर मुलांनी कागदाची जहाज बनविण्याचा उपक्रम राबविला व ते जहाज पाण्यात सोडले. नंतर सर्व मुलांनी पाण्यात नृत्य केले. यात सिनियर केजी व ज्युनिअर केजी च्या ४५० मुलांनी सहभाग घेतला. नर्सरी च्या विद्यार्थ्यांसह माता पालकांनी देखील सहभाग घेतला. एकूण ६०० मुलांनी आणि पालकांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना ऋतू विषयी माहिती आणि पावसाळा ऋतू मध्ये खाण्यात येणारे अन्न, वापरण्यात येणारे वस्तु आणि पेहराव याची माहिती मुलांना मिळावी हा कार्यक्रमाचा उद्देश होता. विद्यार्थ्यांनी पाण्यात भिजून नृत्याचा आनंद लुटला.

# स्वच्छता ही सेवा मोहिमेंतर्गत अधिकाऱ्यांच्या हाती झाडू, कार्यालय झाली चकाचक



**धुळे । प्रतिनिधी**

स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत रविवारी ठीक ठिकाणी स्वच्छतेसाठी श्रमदान करण्यात आले, स्वच्छता शपथ घेण्यात आली, जिल्हा, तालुकास्तरावरील शासकीय कार्यालयां मध्ये अधिकाऱ्यांनी हाती झाडू घेऊन स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. त्यामुळे शासकीय कार्यालय चकाचक झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत दरवर्षी दिनांक १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. अश्विनीताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शुभम गुप्ता, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री देवेंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रकांत पवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री बाळासाहेब बोटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात येत आहे. कचरा मुक्त भारत अशी या वर्षाची संकल्पना आहे स्वच्छता ही सेवा अभियानाच्या निमित्ताने रविवारी जिल्ह्यातील गावागावांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसह गाव पातळीवरील विविध संस्थांचे सदस्य, स्वच्छाग्रही,आशा वर्कर, बचत गट महिला, ग्रामसेवक, शिक्षक, ग्रामस्थ यांनी सहभाग नोंदविला.श्रमदानातून कार्यालय, परिसर स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. तसेच जिल्हा आणि तालुका स्तरावरील कार्यालयांमध्ये अधिकाऱ्यांनी हाती झाडू घेत स्वच्छतेसाठी श्रमदान केले. यामुळे कार्यालय चकाचक झाल्याचे दिसून आले. जिल्हा परिषद मुख्यालयात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रकांत पवार, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रदीप पवार, महिला बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री हेमंतराव भदाणे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री मुकेश ठाकूर, पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती जयश्री सार्वे यांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांनी देखील कार्यालयाची साफसफाई केली.

स्वच्छता ही सेवा २०२३ ची थीम कचरामुक्त भारत आहे. यामध्ये दृष्यमान स्वच्छता व सफाईमित्र कल्याण यावरती लक्ष केंद्रित केले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्वच्छतेचे उपक्रम राबविणे आवश्यक असून यामध्ये स्वयंस्फूर्तीने श्रमदान करणे गरजेचे आहे. या स्वच्छता मोहिमेला लक्ष केंद्रित करून ग्रामीण भागातील बसस्थानक, पर्यटन स्थळे, वारसा स्थळे, नदी किनारे, घाट, नाले आदी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करण्यावर भर दिला जात आहे.

# भटाणेच्या सरपंचपदी सुवर्णा पाटील बिनविरोध

**शिरपूर । प्रतिनिधी**

भटाणे (ता. शिरपूर) येथील ग्रामपंचायतीत झालेल्या फेरनिवडणुकीत दोन अर्जांपैकी मोहित प्रेमराज पाटील यांनी आपला अर्ज माघारी घेतल्याने सुवर्णा संजय यांची बिनविरोध निवड झाली.

येथील सरपंच विकास पाटील यांनी १४ ऑगस्टला आपल्या वैयक्तिक कारणास्तव पंचायत समिती सभापतींकडे राजीनामा सदर केला होता. रिक्त पदासाठी बुधवारी (ता. २०) निवडणूक झाली. इतर मागास प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या सरपंचपदाकरिता मोहित पाटील व सुवर्णा पाटील असे दोन अर्ज आले होते. माघारीच्या अंतिम क्षणी मोहित पाटील यांनी अर्ज माघारी घेतला. दुपारी दोनला निवडणूक अध्यासी अधिकारी मुकेश भावसार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत मनीषा पाटील, मोहित पाटील, संजय भिल, लक्ष्मण पाटील, मोनिता गिरासे, विकास पाटील, जिजाबाई गिरासे, जन्याबाई भिल, सुवर्णा पाटील, मिलिंद ईशी, मंगल मोरे असे सर्व अकरा सदस्य हजर होते. निवडीबद्दल माजी सरपंच विकास पाटील, उपसरपंच मिलिंद भाईदास पाटील व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले. निवडणूक यशस्वितेसाठी निवडणूक अध्यासी अधिकारी मुकेश भावसार यांनी काम पाहिले, तर ग्रामसेवक एम. बी. पारधी, तलाठी अहिरे यांनी प्रयत्न केले.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
शुक्रवार, दि. २२ सप्टेंबर २०२३




# भक्तीमय वातावरणात घरोघरी गौराईचे आगमन

## महिलांनी आनंद व्यक्त करीत फुगड्यांचा धरला फेरा











धुळे

। महिलांनी आपल्या लाडक्या गौराईला आपल्या घरी सोन पावलांनी आणले. यावेळी महिलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला. गौरी आगमनाचा आनंद व्यक्त करीत फुगड्यांचा फेरा धरला. मोठ्या भक्तिमय वातावरणात गणपती पाठोपाठ घरोघरी गौराईचे आगमन झाले.महिलांनी आपल्या लाडक्या गौराईला आपल्या घरी सोन पावलांनी आणले. यावेळी महिलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला. पुढील दोन दिवस घरोघरी गौराई गणपती शेजारी प्रतिष्ठापित होतात आणि महिला तिची भक्तीने पूजा करीत असतात. आज पहिल्या दिवशी भाजी भाकरीचा निवैद्य गौरीला दाखवला जातो तरआज पुरणपोळीचा नैवद्य आपल्या लाडक्या गौराईला दाखवला जातो. मोठ्या भक्तिमय वातावरणात महिलांनी नदीपासून गौरीला डोक्यावर घेऊन आपल्या घरोघरी नेले. यावेळी महिलांनी गौरी आगमनाचा आनंद व्यक्त करीत फुगड्यांचा फेरा धरला. दीड दिवसांच्या गणपतीचे सुद्धा उत्साहात विसर्जन करण्यात आले. तर शहरी भागात इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारापासून वाजतगाजत गौरीचा गृहप्रवेश होतो. यंदाच्या वर्षी विधीवत पूजन करुन दुपारनंतर घरोघरी गौराई विराजमान झाल्या. फळ, पान, फुलं, तांब्यांच्या घागरी यांची आकर्षक सजावट केल्याने देवीचे मनमोहक रुप लक्षवेधी ठरत होते.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# गणेश मूर्ती, मंडप अन् सजावट, सगळंच भव्यदिव्य

## उत्साहाचे वातावर : शहरातील गणपती मंडळांच्या सजावटीचे काम पूर्णत्वास
























धुळे । गणेशोत्सवाची सुरुवात झाली असून धुळ्यातील अनेक गणेश मंडळ राज्यात प्रसिद्ध आहे. गणेश मूर्ती आणि सजावट पाहण्यासाठी भाविक मोठी गर्दी दिसून येते आहे. यामध्ये धुळ्याचा राजा हिंदू एकता गणेश मंडळ, मंगलमूर्ती मित्र मंडळ, श्री राणा प्रताप मंडळ, पवनपुत्र गणेश मंडळ, जय बालाजी मित्र मंडळ, त्रिमूर्ती मित्र मंडळ, जाणता राजा मित्र मंडळ, शिवगर्जना ग्रुप अश्या अनेक वेगवेगळ्या मंडळातील गणेशमूर्ती, त्यांची सजावट आणि अन्य गोष्टी पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होती. अतिशय खास पद्धतीने सजावट करण्यात येत असल्याने देखील भाविकांची आरतीवेळी मोठी गर्दी होते. प्रबोधनात्मक आणि धार्मिक देखावे गणेशोत्सवाचे खास आकर्षण असते. शहरातील प्रमुख व बड्या गणपती मंडळांच्या सजावटीचे काम पूर्णत्वास आले आहे.

संकलन : दिपक वाघ